# एन. एस. एस. विशेष शिबीर, ढवळेवाडी

दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या एन एस एस एककाचे विशेष शिबीर शनिवार दि.०९/१२/२०१७ ते शुक्रवार दि.१५/१२/२०१७ या कालावधीत ढवळेवाडी या ठिकाणी यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबीराचे उद्‌घाटन मा. श्री. नामदेव पाटील, तहसिलदार, पाथर्डी यांच्या हस्ते व मा श्री. शिवाजीराव राजळे अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती यांच्या अध्यक्षेतेखाली संपन्न झाले. विद्यार्थ्यांना समाजकार्याची जाणीव करुन देतानांच त्यांचा व्यक्तीमत्त्व विकास घडवुन आणण्याच्या उद्देशाने हे शिबीर आयोजित केले होते. शिबीर कालावधी मध्ये स्वयंसेवाकांनी गावात विविध समाज उपयोगी कामे केली. त्यात ग्राम स्वच्छता, लक्ष्मी मंदिर परिसर स्वच्छता, वस्ती शाळा स्वच्छता केली. चितळे वस्ती शाळेसाठी मैदान निर्माण केले. मैदान तयार झाल्यावर शाळेच्या मुलाच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. माने वस्ती शाळेत वृक्षरोपनासाठी खड्डे घेतले. ढवळेवाडी फाटा ते गावापर्यंतच्या रस्त्यावरचे खड्डे बुजवले. हनुमान मंदिरासाठी पायऱ्या बनवल्या, ग्रामपंचायत परिसर स्वच्छता केली आणि गावातील पाच सार्वजनिक पाणीपुरवठा टाक्याशेजारी शोषखड्डे घेतले.

अशा श्रमदानाच्या कामा बरोबरच विद्यार्थ्यांनी गावातील कुटुंबाचे सर्वेक्षण केले. मुलानी कुटुंबाशी संवाद साधला त्यामुळे त्यानां त्याच्या समस्या कळाल्या. या सर्वेक्षणा मध्ये मिळालेली माहिती एकुण कुटुंब-१८८ तील ११५४ लोकसंख्या सर्वे केला त्यात २२८ निरक्षर होते, ९६५ एकर शेती, मोठ्या प्रमाणावर पशुधन होते त्यात शेळी-६५४,गाय -३७६ म्हैस -८२ आहेत. ४५ कुटुंबाकडे स्वच्छतागृह नाही. १७६ लोक आपल्या महाविद्यालयात शिकले होते. ग्रामपंचायती कडुन ग्रामस्थांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या १)वस्तीवर सिंगल फेज विज २) सार्वजनिक नळ योजना. या सर्वेक्षणामुळे शिबीरार्थी व गावकऱ्यांमध्ये संवाद निर्माण झाला. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यासाठी बौध्दीक कार्यक्रमाचे आयोजन करणात आले होते. यामध्ये प्रा. गंगाधर लवांडे - आपत्ती व्यवस्थापन, मा. सौ. मिरा पाटील- समाज प्रबोधन, डॉ. जनार्धन नेहुल- वृक्ष संवर्धन व ग्रामविकास,

डॉ. मेहबुब तांबोळी- व्यक्तीमत्व विकास व प्रा. अमोल आगासे- साहित्य व जीवन या विषयावर व्याख्याने देऊन विद्यार्थ्यांचे या विषयावर प्रबोधन केले.

विद्यार्थ्यांनी गावात प्रबोधन दिंडी काढुन बेटी बचाव बेटी पढाव, वृक्ष वाचवा, स्वच्छता हीच सेवा या विषयी गावकऱ्यामध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला. या शिबीरामध्ये विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला गेला त्यातुन अनेक विद्यार्थ्यामध्ये विविध कलागुण असल्याचे निदर्शनास आले. त्यात काही उत्तम गायक , मृदुंग वादक, अभिनेता , कवी होते. त्यानी गावकऱ्यांसाठी विविध सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले. या शिबीरामधुन मुलामध्ये व्यासपीठावर जाऊन उभे राहण्याचे, बोलण्याचे धाडस निर्माण झाले, मुला मुलींमध्ये संवाद निर्माण झाला. त्याना समाजात वावरण्याची जाण निर्माण झाली. या शिबीरामध्ये वरीलप्रमाणे झालेल्या सर्व उपक्रमांतुन विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात आले. पहिल्या दिवसापासुन ते शेवटच्या दिवसा पर्यंत पहावयास मिळालेले बदल याची साक्ष देतो.

या शिबीराचा समारोप मा. श्री राहुलदादा राजळे, सदस्य, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या प्रमुख उपस्थित झाला. विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाबद्दल सरपंच, ग्रामसेवक व गावकऱ्यानी समाधान व्यक्त केले.